महाराष्ट्र शासन

**क्र.बैठक-२०१९/प्र.क्र.१५६/ई-१०**
महसूल व वन विभाग, मुख्य इमारत,
पहिला मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३
**दिनांक- १ ऑक्टोबर, २०१९**
doe10.rfd@maharashtra.gov.in

**प्रति,**

**सर्व जिल्हाधिकारी**

**विषय :-** जिल्हांतर्गत आंतरविभागात बदली करतांना जिल्हा स्तरावरील सेवाजेष्ठता कायम ठेवणेबाबत...

**महोदय,**

तलाठी संवर्गाकरीता स्वतंत्र बिंदूनामावली, स्वतंत्र जेष्ठता यादी, स्वतंत्र नियुक्ती प्राधिकारी आहे. सबब, बदलीच्या अटी व शर्तीनुसार जिल्ह्यातील एका उप विभागातून दूसऱ्या उप विभागात विनंतीवरुन तलाठ्याची बदली झाल्यास, काही जिल्ह्यांमध्ये बदलीनंतरच्या उप विभागात जेष्ठता ठरवितांना मागील सेवेचा फायदा संबंधित तलाठ्याला जेष्ठतेसाठी मिळत नाही आणि संबंधित तलाठी बदलीच्या उप विभागात तेथे अगोदर नियुक्त असलेल्या तलाठ्यांना कनिष्ठ ठरत असल्याचे शासनाचे निदर्शनास आले आहे.

२. तसेच काही जिल्ह्यांमध्ये, एका विभागातून दुसऱ्या उप विभागात विनंतीवरुन तलाठ्याचा उप विभाग बदल झाल्यास बदलीनंतरच्या उप विभागात जेष्ठता ठरवितांना मागिल सेवेचे फायदा संबंधित तलाठ्यांना सेवाजेष्ठतेसाठी मिळतो. सबब, सदर प्रकरणी एकसुत्रता आणण्याच्या दृष्टीने तलाठ्यांच्या सेवाजेष्ठतेबाबत आपल्या कार्यालयाकडून अवलंबण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीचा अहवाल आपल्या **स्वयंस्पष्ट अभिप्रायासह** शासनास विनाविलंब सादर करावा, ही विनंती.

आपला

(र. धों. कटके)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

Scanned by CamScanner